# -व्यवस्थापन परिषद सभेचा कार्यवृत्तांत -

सोलापूर विद्यापीठाच्या **व्यवस्थापन परिषदेची सभा गुरुवार दि.०४/०९/०८ रोजी दुपारी १-०० वा.** व्यवस्थापन परिषद सभागृहात झाली. या सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. बी. पी. बंडगर - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | ॲड. रामदास पी. सब्बन | सदस्य |
| ३) | शिक्षण संचालक पुणे यांचे प्रतिनिधी शिक्षण सहसंचालक कोल्हापूर डॉ. बी. बी. कदम | सदस्य |
| ४) | डॉ. एल. पी. देशमुख | सदस्य |
| ५) | प्रा. डॉ. आर. एन. शेंडगे, संचालक, म. व वि.वि.मं. - पदसिध्द | सदस्य |
| ६) | प्राचार्य जे. के. बिले | सदस्य |
| ७) | श्री. पी. आर. हिरेमठ | सदस्य |
| ८) | प्राचार्य डॉ. सी. बी. कोळेकर | सदस्य |
| ९) | श्री. एन. बी. पवार | सदस्य |
| १०) | श्रीमती एन. व्ही साठे | सदस्या |
| ११) | प्रा. बी. पी. रोंगे | सदस्य |
| १२) | डॉ. पी. जी. मोरे | सदस्य |
| १३) | श्री. माणिक कौरथी - वित्त व लेखा अधिकारी | स्थायी निमंत्रित |
| १४) | डॉ. एम. एस. शेजूळ - प्र. परीक्षा नियंत्रक तथा कुलसचिव | स्थायी निमंत्रित तथा सचिव |

सभेच्या सुरुवातीला कुलसचिव यांनी श्रीमती मिनाक्षी कदम, डॉ. श्रीमती व्ही. जे. नाईकनवरे आणि श्री. जयसिंह मोहिते-पाटील यांनी सदर सभेस उपस्थित राहू शकत नसल्याचे अनुक्रमे पत्राद्वारे आणि दूरध्वनीद्वारे कळविल्याचे सांगितले त्यानुसार व्यवस्थापन परिषदेने याची नोंद घेतली.

**विषय क्र. १** **दि.०९ जुलै २००८ आणि दि.२६ जुलै २००८ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

**ठराव क्र.१** **दि. ०९ जुलै २००८ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत खालील दुरुस्त्यांसह वाचून कायम करण्यात आला.**

**१) पान क्र. ०२ वर, दि.०९ जुलै २००८ रोजी व्यवस्थापन परिषदेच्या सभेस उपस्थित सदस्याच्या यादीत "श्रीमती एन. व्ही. साठे" यांचे नाव नजरचुकीने राहून गेले आहे त्या यादीत "श्रीमती एन. व्ही. साठे" यांच्या नावाचा समावेश करावा.**

**२) याच पानावर, तिसऱ्या परिच्छेदामध्ये ओळ क्र. ४ मधील, "मृतात्म्यास"**

याऐवजी "आत्म्यास" अशी दुरुस्ती करावी.

३) पान क्र. ०६ वर, ठराव क्र. ८(४) मध्ये, "प्रा. बी. आर.पिरगोंडे" याऐवजी "प्रा. पी. आर. पिरगोंडे" अशी दुरुस्ती करावी.

दि.२६ जुलै, २००८ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत खालील दुरुस्त्यांसह वाचून कायम करण्यात आला.

१) पान क्र.०९ वर, परिच्छेद क्र. २ मध्ये, मा. श्री. जयसिंह मोहिते-पाटील यांच्या नावानंतर "प्रा. बी. पी. रोंगे" यांच्या नावाचा समावेश करावा

२) पान क्र.११ वर, ठराव क्र. २ मध्ये, गणित विभागाखालील श्री. जेटीथोर ए. ए. यांना रु.१२,०००/- ऐवजी रु.६,०००/- आणि रसायनशास्त्र विभागाखालील श्री. शेख एम. एम. यांना रु.१२,०००/- ऐवजी रु.६,०००/- तसेच शिक्षणशास्त्र विभागाखालील क्र. १ मध्ये कु. दातार योगिता गजानन यांच्याऐवजी श्रीमती पी. आर. चिंचोळकर अशी दुरुस्ती आणि क्र. ४ येथे श्रीमती तळभंडारे यांना रु.१०,०००/- ऐवजी रु.१२,०००/- या दुरुस्त्या कराव्यात.

**विषय क्र. २** **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा. कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

**( सोबत अहवाल जोडला आहे.)**

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार मा. कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा. कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.

**ठराव क्र. २** **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा. कुलगुरु यांनी सादर केलेला अहवाल खालील दुरुस्त्यांसह मान्य करावा असे ठरले.**

**१) पान क्र.१५ वर, विद्यार्थी कल्याण विभागाच्या माहितीमध्ये, "प्रा. तुकाराम शिंदे यांची राष्ट्रीय सेवा योजनेच्या समन्वयकपदी पुनर्नियुक्ती करण्यात आली" अशी दुरुस्ती करावी.**

**विषय क्र. ३** **दि.१६/०७/२००८ रोजी आयोजित करण्यात आलेल्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत मान्यतेसाठी सादर.**

टिपणी :- दि.१६/०७/२००८ रोजी आयोजित केलेल्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. तो व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र. ३** **दि.१६/०७/२००८ रोजी आयोजित करण्यात आलेल्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांतास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

**विषय क्र. ४ चेंजिस इन स्टाफच्या समितीने सादर केलेल्या महाविद्यालयातील शिक्षकांना मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ.**

सोलापूर विद्यापीठ परिक्षेत्रातील संलग्नित महाविद्यालयाकडील शिक्षकांना चेंजिस इन स्टाफ मान्यता देण्यासाठी Ordinance 0.59 प्रमाणे गठीत केलेल्या समितीच्या बैठक दि.२०/१२/२००७ रोजी झाली. सदरच्या बैठकीमध्ये सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे चेंजिस इन स्टाफच्या प्रस्तावातील मान्यतेमध्ये कांही त्रुटी आहेत. सदरच्या नामंजूर प्रस्तावांना Ordinance 0.65 प्रमाणे व्यवस्थापन परिषदेची मान्यता आवश्यक आहे.

सदरचा अहवाल व्यवस्थापन परिषदेसाठी विचारार्थ व मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र. ४ चेंजिस इन स्टाफच्या समितीने सादर केलेल्या महाविद्यालयातील शिक्षकांना मान्यता देण्याबाबतच्या प्रस्तावास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

**विषय क्र. ५ विद्यापीठ प्रशासनाने विद्यापीठाकडील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांच्या मानधन व इतर बिलामधून ५ टक्के रक्कम कपात करुन ती रक्कम विद्यापीठ विकास निधीमध्ये वर्ग करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी- सोबत व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. पी. जी. मोरे यांचे पत्र जोडले असून कृपया ते अवलोकनी घ्यावे.
डॉ. पी. जी. मोरे यांनी विद्यापीठ विकास निधी वाढविण्याच्या दृष्टीने खालील उपाययोजना सुचविली आहे.
"विद्यापीठ प्रशासनाने शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि संलग्नित महाविद्यालये व या महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांच्या मानधन व इतर बिलामधून ५ टक्के रक्कम कपात करुन ती रक्कम विद्यापीठ विकास निधी खात्यामध्ये वर्ग करावी".
सबब, उपरोक्त विषय व्यवस्थापन परिषदेसमोर विचारार्थ सादर.

**ठराव क्र. ५ खालील मुद्दयांचा ऊहापोह करुन अहवाल सादर करण्यासाठी खालील सदस्यांची समिती नियुक्त करण्यात आली.**

**१) मानधनाबाबत.**
**२) वेगवेगळ्या फीबाबत.**
**३) विद्यापीठ विकास निधीसाठी ५%रक्कम मानधनातून कपात करण्याबाबत.**

| | | | |
|---|---|---|---|
| **१)** | **प्राचार्य डॉ. सी. बी. कोळेकर** | **-** | **अध्यक्ष** |
| **२)** | **प्रा. एन. बी. पवार** | **-** | **सदस्य** |
| **३)** | **श्रीमती एन. व्ही. साठे** | **-** | **सदस्या** |

४) विद्यापरिषदेमधून २ सदस्य घेण्याचे अधिकार मा.कुलगुरु यांना देण्यात आले.
५) इतर २ नावे सुचविण्याचेही अधिकार मा.कुलगुरु यांना देण्यात आले.

विषय क्र. ६ विधान परिषदेमध्ये राज्यमंत्री मा.श्री.सुरेश शेट्टी यांनी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचेकडे जमा असलेल्या निधीमधून सोलापूर विद्यापीठास सोलापूर जिल्ह्याचा हिस्सा म्हणून येणारी रक्कम देण्याबाबत विधानपरिषदेस अश्वासन दिले होते. त्यासंदर्भात मा.प्रधान सचिव उच्च व तंत्र शिक्षण यांनी या संदर्भात विद्यापीठास पत्र पाठविले आहे. ते पत्र व्यवस्थापन परिषदेसमोर अवलोकनार्थ.

ठराव क्र. ६ दि.०१ ऑगस्ट २००४ रोजी शिवाजी विद्यापीठामधून सोलापूर विद्यापीठाची निर्मिती करण्यात आली. त्याअगोदरचे आर्थिक वर्ष २००३-०४ च्या ताळेबंदपत्रकात विद्यापीठ व इतर राखीव निधी साधारणपणे रु.६८ कोटी रुपयापर्यंत आहे. सबब सदर निधीपैकी सोलापूर जिल्ह्याचा विचार करता १/४ निधी शिवाजी विद्यापीठाकडून सोलापूर विद्यापीठाकडे या विद्यापीठाचा हक्क म्हणून वर्ग झाला पाहिजे. यास विधापनपरिषदेत लोकप्रतिनिधींनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेस अनुसरुन मा.मंत्रीमहोदयांनी सदर निधी शिवाजी विद्यापीठाने सोलापूर विद्यापीठाकडे एक महिन्यात वर्ग करण्यात येईल असे आश्वासन सदर सभागृहास सन२००५ च्या पहिल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिलेले आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाचे क्र. विपआ२००५/(१३४/०५)/विंशि-५, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय विस्तार भवन यांचे दि.१२ ऑगस्ट २००८ चे पत्र सभेपुढे ठेवण्यात आले. सर्व बाबींचा विचार करुन सर्वानुमते खालीलप्रमाणे ठरविण्यात आले.

१) ही व्यवस्थापन परिषद विद्यापीठाच्या वतीने विधानपरिषदेचे आणि महाराष्ट्र शासनाचे आभार मानत आहे.
२) दि.३१ मार्च २००४ च्या शिवाजी विद्यापीठाच्या ताळेबंद पत्रकातील विद्यापीठ व इतर राखीव निधीतील सोलापूर विद्यापीठाच्या हिश्याची मंत्रीमहोदयांनी विधानपरिषदेत आश्वासित केलेली १/४ रक्कम सोलापूर विद्यापीठास शिवाजी विद्यापीठाकडून लवकरात लवकर मिळावी अशी विनंती महाराष्ट्र शासनास करण्यात येत आहे.
३) शासनाच्या वरील पत्रास अनुसरुन शिवाजी विद्यापीठ आणि सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरुंची याबाबत बैठक घेण्याच्या दृष्टीने सोलापूर विद्यापीठाने प्रयत्न करावेत.

**विषय क्र. ७ प्रा.व्ही.तिरुपती अहवालामध्ये ज्या व्यक्तींवर सदर अहवालामध्ये कारवाई करण्याची शिफारस केलेली होती त्यांना मा.कुलगुरुमहोदयांनी गठीत केलेल्या समितीसमोर आपले म्हणणे मांडण्याची संधी देवून त्या म्हणण्यासहीत अहवालाबाबत कार्यवाहीचा विषय व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

टिपणी :- व्यवस्थापन परिषदेच्या दि.११/०४/२००७ रोजीच्या सभेतील विषय क्र.१२ नुसार खालील विषयांची चौकशी करण्यासाठी

१. महात्मा फुले मागासवर्गीय बहुउद्देशीय विकास संस्था वाखरी, ता. पंढरपूर या संस्थेस बॅचलर ऑफ नॅचरोपॅथी ॲन्ड योगिक सायन्स पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी दिली.
२. बी. ए. बी. एड. अभ्यासक्रमास व्यवस्थापन परिषदेची मान्यता नसताना मान्यता दिली.
३. शासन, व्यवस्थापन परिषद व शुल्क समितीची मान्यता न घेता बी. एड.चे शुल्क वाढविले.
४. वालचंद इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी येथील शिक्षक कर्मचाऱ्यांचे विद्यापीठामार्फत प्लेसमेंट झालेले आहे, ती कागदपत्रे महाविद्यालयाशी संबंधित लोक परस्पर घेवून गेले.

प्रा.व्ही.तिरुपती -- अध्यक्ष
प्रा.बी.पी.रोंगे -- सदस्य
प्रा.एन.बी.पवार -- सदस्य

यांची समिती गठीत केली होती. या समितीने चौकशी करुन सादर केलेला अहवाल दि.२७/१२/२००८ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेत विषय क्र.१० अन्वये सादर करण्यात आला. यावरील ठरावानुसार माजी कुलगुरुंना वगळून इतर ज्या व्यक्तींवर सदर अहवालामध्ये कारवाई करण्याची शिफारस केलेली आहे अशा व्यक्तींना मा.कुलगुरुंमहोदयांनी गठीत करावयाच्या समितीसमोर आपले म्हणणे मांडण्याची नैसर्गिक न्यायतत्त्वानुसार संधी देवून त्या म्हणण्यासहीत अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या आगामी सभेपुढे ठेवण्यात यावा असे ठरले. त्यानुसार मा.कुलगुरु यांनी त्यांच्या अध्यक्षतेखाली प्रा.एन.बी.पवार, डॉ.सी.बी.कोळेकर, सौ.एन.व्ही.साठे, डॉ.पी.जी.मोरे यांची समिती नियुक्त केली होती.

या समितीने दि. २४/०१/२००८, दि.०४/०२/२००८ सभा घेवून कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या दि.२८/०३/२००८ रोजीच्या सभेपुढे विषय क्र.१४ नुसार व्यवस्थापन परिषदेच्या सभेत सादर करण्यात आला होता. दि.२८/०३/२००८ रोजीच्या सभेच्या कार्यक्रमपत्रिकेमध्ये या विषयाचे कागदपत्रे देण्यात आली आहेत.

सदरचा विषय परत एकदा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

ठराव क्र. ७ **सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या पुढील सभेत ठेवावा असे ठरले.**

विषय क्र. ८ **दलित मित्र कदम गुरुजी विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयाबाबतीतील सब्बन समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी :- दलित मित्र कदम गुरुजी महाविद्यालयातील विविध तक्रारीची चौकशी करण्याकरिता दि.०९/१०/२००६ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेमध्ये ठराव क्र.१५ प्रमाणे मा.ॲड. रामदास पी.सब्बन यांच्या अध्यक्षतेखाली ०७ सदस्यांची समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने सर्व बांबीची चौकशी करुन आपला अहवाल विद्यापीठास सादर केला. सदरचा अहवाल दि.०८/१०/२००७ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेत विषय क्र.१० अन्वये सादर करण्यात आला. डॉ. सुभाष कदम यांना दि.२७/०३/२००८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेतील विषय क्र.१३ अन्वये नैसर्गिक न्यायतत्वानुसार म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली. परंतू त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याकरीता हवी असलेली कागदपत्रे मिळण्याकरीता पुन्हा एकदा दि.०९/०७/२००८ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेत विषय क्र. ८ (२) अन्वये म्हणणे मांडण्यासाठी संधी देण्यात आली. यावर सदरचा विषय पुढील व्यवस्थापन परिषदेच्या पुढील सभेत सादर करावे असे ठरले.

सदर विषय व्यवस्थापन परिषदेच्या समोर विचारार्थ सादर करण्यात आला आहे.

ठराव क्र. ८ **व्यवस्थापन परिषदेच्या दि.०९/१०/२००६ रोजीच्या सभेतील विषय क्र. १५ वरील ठरावानुसार, दलित मित्र कदम गुरुजी विज्ञान महाविद्यालय मंगळवेढा प्राचार्य डॉ.सुभाष कदम यांच्या प्राचार्य पदाच्या नेमणूकीला दिलेली मान्यता मागे का घेवू नये? याबाबत द्यावयाच्या नोटीसीच्या मसूद्याला मंजूरी देण्याबाबत ॲड. रामदास पी. सब्बन यांच्या अध्यक्षतेखाली प्राचार्य जे. के. बिले, डॉ. सी. बी. कोळेकर, डॉ. एल. पी. देशमुख, श्री. एन. बी. पवार, श्रीमती एन. व्ही. साठे आणि डॉ. आर. आर. पाटील संचालक महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ यांची समिती नियुक्त करण्यात आली होती. या समितीचे सचिव डॉ.आर. आर. पाटील होते. सदर समितीने महाविद्यालयास प्रत्यक्ष भेट देऊन सर्व संबंधितांचे म्हणणे ऐकून घेऊन आणि कागदपत्रांची पडताळणी करुन सविस्तर चौकशी अहवाल विद्यापीठास सादर केला. सदरचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या दि.०८/१०/२००७ रोजीच्या सभेत विषय क्र. १० अन्वये सादर करण्यात आला. यावरील ठरावानुसार, डॉ. सुभाष कदम यांना नैसर्गिक न्यायतत्वानुसार म्हणणे मांडण्याची संधी अनुक्रमे व्यवस्थापन परिषदेच्या २७/०३/२००८ व ०९/०७/२००८ च्या सभेत देण्यात आली. आज दि.०४/०९/२००८ रोजी डॉ. सुभाष कदम व्यवस्थापन परिषदेसमोर उपस्थित झाले. डॉ. कदम यांनी सदर प्रकरणी अधिक काही सांगावयाचे नाही असे सांगितले. वरील ॲड. रामदास पी. सब्बन**

**समितीचा अहवाल आणि डॉ. कदम यांचे म्हणणे विचारात घेता, व संबंधित कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर खालीलप्रमाणे सर्वानुमते ठरविण्यात आले.**

**१) ॲड. रामदास पी. सब्बन समितीचा दि.०८/१०/२००७ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेतील विषय क्र. १० अन्वये सादर केलेला अहवाल शिफारशीसह मान्य करण्यात आला.**

**२) प्राचार्य डॉ. सुभाष कदम यांची प्राचार्य पदाची मान्यता काढून घेण्याचे ठरले.**

**मा.कुलगुरु यांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय:-**

**विषय क्र. ९(१) डॉ. आर. एन. शेंडगे, संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ यांना अधिकच्या घरभाडयाचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी:- डॉ.आर.एन.शेंडगे यांनी संचालक महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ हे पद दि.०१/०८/२००८ पासून धारण केलेले आहे. त्यांच्या अंतिम प्रमाणपत्रानुसार त्यांना २५%घरभाडे भत्ता मिळत होता. शासन नियमानुसार सोलापूर शहरात १५% घरभाडे अनुज्ञेय असल्याने डॉ. शेंडगे यांना १०% घरभाडे भत्ता कमी मिळणार असल्याने त्यांना आर्थिक हानी होणार आहे. यथास्तव त्यांना २५% घरभाडे देण्याचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र. ९(१) डॉ.आर. एन. शेंडगे संचालक महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ यांना अधिकच्या घरभाड्याबाबत शासनाकडून मार्गदर्शन घ्यावे असे ठरले.**

**विषय क्र. ९(२) सोलापूर विद्यापीठाच्या आवारातील विविध इमारतीच्या बांधकामासाठी वास्तुविशारद सूची तयार करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.**

टिपणी :- सोलापूर विद्यपीठाच्या आवारातील विविध इमारतीच्या बांधकामासाठी वास्तुविशारद सूची तयार करण्यासाठी दै.सकाळ, दै.पुढारी व दै. लोकमत मधून जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून एकूण १३ फर्मने अर्ज सादर केलेले होते. यापैकी ०२ लॅण्डस्केप आर्किटेक्ट आणि ०४ आर्किटेक्ट प्लॅनर व इंटेरिअर डिझाईनर यासाठीची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर व स्ट्रक्चरल डिझायनर ०२ जणांचे अर्ज सादर केलेले होते. यासाठीची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र. ९(२)** **सोलापूर विद्यापीठाच्या आवारातील विविध इमारतीच्या बांधकामासाठी तयार करण्यात आलेल्या वास्तुविशारद सूचीस खालील दुरुस्त्यांसह व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**
**१) पान क्र.५० वर, आर्कीटेक्ट, इंटेरिअर डिझाईनर, प्लॅनर याअंतर्गत श्री.केदार कुलकर्णी पुणे (मोबाईल क्रमांक ९८२२०३८९७१) आणि श्री.चंद्रकांत दिवटे कोल्हापूर (मोबाईल क्रमांक ९८२२०४३०७८) तसेच लॅण्डस्केप आर्कीटेक्ट याअंतर्गत श्री. सत्यजित पाटील आर्कीटेक्ट (मोबाईल क्रमांक ९८९०७७८८८१) यांच्या नावाचा समावेश करावा.**

**विषय क्र. ९(३)** **दि.०२/०९/२००८ रोजी आयोजित करण्यात आलेल्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत मान्यतेसाठी सादर.**

टिपणी:- दि.०२/०९/२००८ रोजी आयोजित केलेल्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. तो व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र. ९(३)** **दि.०२/०९/२००८ रोजी आयोजित करण्यात आलेल्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास खालील दुरुस्तीसह व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**
**१) पान क्र.५७ वर, ठराव क्र. ३ मध्ये, "कमीत कमी दराने" ऐवजी "कमीत कमी असलेला दर" असे नमूद करण्यात यावे.**

**विषय क्र. ९(४)** **श्री.हुळ्ळे डी.एस. भांडारपाल यांना ०२ वर्षाचा या पदाचा धारणाधिकार (lien) मंजूरीचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी :- श्री. हुळ्ळे डी.एस. भांडारपाल या पदावर दि.०३/०७/१९९१ पासून कार्यरत आहेत. त्यांचे सरळसेवा भरतीव्दारे अधीक्षक या पदावर निवड झाल्यामुळे त्यांनी अधीक्षक पदावर रुजू होवून भांडारपाल पदाचा २ वर्षाचा धारणाधिकार (Lien) मंजूर करावा अशी विनंती केली आहे.

सबब, सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेसमोर विचारार्थ सादर.

**ठराव क्र. ९(४)** **विद्यापीठात जे कर्मचारी कायम पदावर कार्यरत आहेत आणि त्यांची विद्यापीठातच इतर पदावर नियुक्ती झालेली आहे त्यांना त्यांच्या विनंती पत्रानुसार धारणाधिकार (Lien) देण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

**विषय क्र. ९(५)** **वकीलांचे पॅनेल ठरविण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**
**(सोबत तक्ता जोडला आहे.)**

टिपणी :- विद्यापीठाकडील विविध कोर्ट केसेस, न्यायालयात रिट दाखल करणे, सूट फाईल करणे इत्यादी अनुषंगिक कोर्ट कामाकरीता वकीलांचे पॅनेल ठरविण्यासाठी स्थानिक दैनिक वर्तमानपत्र लोकमतच्या दि. १४/०४/२००८ च्या आवृत्तीमधून जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. या जाहिरातीस अनुसरुन एकूण १० फर्मकडून अर्ज प्राप्त झाले आहेत.

सदरचा वकीलांचे पॅनेल ठरविण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र. ९(५)** **वकीलांचे पॅनेल ठरविण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांकडून अनुभवी वकीलांची नांवे घ्यावीत आणि हा विषय पुढील सभेत सादर करावा असे ठरले.**

**विषय क्र. ९(६)** **संलग्नीकरण शुल्काबाबत.**

टिपणी:- दि.०९/०७/२००८ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करत असताना, या सभेतील विषय क्र.५ वरील चर्चा सुरु असताना संलग्नीकरण शुल्कात बदल करण्याचा विषय व्यवस्थापन परिषदेसमोर सादर.

**ठराव क्र. ९(६)** **एम. ई. ची संलग्नीकरण फी एम. एस्सी. प्रमाणे रु.२०,०००/- करावी. अधिक तुकडीसाठी रु.५००/- ऐवजी रु.१,०००/- असा बदल करावा आणि इंजिनिअरींग व फार्मसी मध्ये इनटेक कॅपॅसिटीत वाढ असल्यास याकरीता रु.५,०००/- शुल्क आकारावे यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने सभा संपल्याचे मा.कुलसचिव यांनी जाहीर केले.

**सही/-**
**एम.एस.शेजूळ**
**सचिव, व्यवस्थापन परिषद**

**सही/-**
**बी. पी. बंडगर**
**अध्यक्ष, व्यवस्थापन परिषद**